# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## अधिसभेच्या चौथ्या सभेचा कार्यवृत्तांत
## शनिवार, दि.२४ मार्च, २०१२ दुपारी १२:०० वा.

अधिसभेची चौथी सभा दि.२४ मार्च, २०१२ रोजी दुपारी १२:०० वा. विद्यापीठ सभागृहात मा. कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ.बंडगर बी.पी.- कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन. - सचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ३) | डॉ. नवले एस. एम. | सदस्य |
| ४) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ.चिट्टे जी.एन. | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ.देशमुख ए.एल. | सदस्य |
| ८) | प्राचार्य डॉ. गणगे के. एन. | सदस्य |
| ९) | प्राचार्य डॉ.गोसावी एस.एन. | सदस्य |
| १०) | प्राचार्य डॉ. कोळेकर सी. बी. | सदस्य |
| ११) | प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. | सदस्य |
| १२) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| १३) | प्राचार्य डॉ. शिंदे डी. के. | सदस्य |
| १४) | श्री. रोंगे बी. पी. | सदस्य |
| १५) | श्री. खंडाळे के.एल., अध्यक्ष, विद्यार्थी परिषद | सदस्य |
| १६) | श्री. पिटके एस.एस., सचिव, विद्यार्थी परिषद | सदस्य |
| १७) | कॅप्टन डॉ. सोनजे एन. पी. | सचिव |
| १८) | डॉ. इंगोले के. जे. | सदस्य |
| १९) | डॉ. कोळेकर टी. एन. | सदस्य |
| २०) | डॉ. चव्हाण सी. एस. | सदस्य |
| २१) | डॉ. भोसले यु. व्ही. | सदस्य |
| २२) | डॉ. बाड डी. आर. | सदस्य |
| २३) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| २४) | डॉ.बारबोले ए.एन. | सदस्य |
| २५) | डॉ. भिलेगावकर एस. डी. | सदस्य |
| २६) | डॉ. श्रीमती दळवी आर.जे. | सदस्या |
| २७) | डॉ. श्रीमती याजमान्य एस.आर. | सदस्या |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| २८) | डॉ. श्रीमती रणनवरे जे. डी. | सदस्या |
| २९) | डॉ. शिंदे एस. व्ही. | सदस्य |
| ३०) | कु.शिंदे पी.एस. | सदस्या |
| ३१) | श्री. पाटील सी.बी. | सदस्य |
| ३२) | श्री. गायकवाड आर. एस. | सदस्य |
| ३३) | श्री. देशपांडे ए. व्ही. | सदस्य |
| ३४) | श्री. गायकवाड एस. पी. | सदस्य |
| ३५) | श्री. शिंदे आर. बी. | सदस्य |
| ३६) | श्री. कोकरे एम. बी. | सदस्य |
| ३७) | श्रीमती विभूते एस. बी. | सदस्या |
| ३८) | श्री. व्हनकळस डी.डी. | सदस्य |
| ३९) | श्री. चौगुले एस. एस. | सदस्य |
| ४०) | श्री. सलगर बी.एस. | सदस्य |
| ४१) | श्री. जमादार के.एम. | सदस्य |
| ४२) | श्री. शेळके बी.बी. | सदस्य |
| ४३) | श्रीमती पाटील एस. एन. | सदस्या |
| ४४) | श्री वाघमोडे एस.एम. | सदस्य |
| ४५) | श्री. रिसबूड एस. एच. | सदस्य |
| ४६) | डॉ. भोसले आर. बी. | सदस्य |
| ४७) | डॉ. पाटील आर. आर. | सदस्य |
| ४८) | डॉ. पवार एन. बी. | सदस्य |
| ४९) | डॉ.निंबाळकर व्ही.एच. | सदस्य |
| ५०) | डॉ. जोशी पी. बी. | सदस्य |
| ५१) | डॉ.कृष्णमूर्ती एम. प्र. अधिष्ठाता, विधी विद्याशाखा | सदस्य |
| ५२) | डॉ. सुर्यवंशी ए. बी. | सदस्य |
| ५३) | प्राचार्या डॉ. श्रीमती पवार व्ही.यू., प्र. अधिष्ठाता, शिक्षणशास्त्र विद्याशाखा | सदस्या |
| ५४) | श्री. कदम एल. एस. | सदस्य |
| ५५) | श्री. कांबळे एन. आर. | सदस्य |
| ५६) | श्री. घागरे एम. व्ही. | सदस्य |
| ५७) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ५८) | डॉ. गवळी आर. एस. | सदस्य |

**स्वागतः**

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**<u>अनुपस्थिती :</u>**

प्राचार्य डॉ.हलकुडे एस.ए., डॉ. गेंगजे एस.आर., डॉ.काशीद एस.एस., श्रीमती डॉ.आपटे एस.एस. व डॉ. अशोककुमार ई.एन. यांनी पत्राद्वारे तसेच श्री. गायकवाड बी.आर., श्री. सपाटे एम.जी., डॉ.बचूटे एम.टी., श्री. साळुंखे-पाटील डी.बी. व डॉ. वडगावकर पी.पी. यांनी दूरध्वनीद्वारे या सभेस अनुपस्थित रहाण्यासंबंधी कळविले होते. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

कुलसचिवांनी मा.कुलगुरुंना तिसरी अधिसभा व चौथी अधिसभा बैठक या दरम्यानच्या कालावधीतील प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. कुलगुरुंनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

- दि. १० डिसेंबर, २०११ रोजी मा. संचालक, सामाजिक वनिकरण विभाग पुणे यांनी सोलापूर विद्यापीठास भेट दिली.
- १२ डिसेंबर, २०११ रोजी प्रा. श्रीमती सरीना परांजपे, सिनिअर प्रोग्राम ऑफिसर USIEF यांचे "Fullbright Fellowship / Scholarship opportunities" या विषयावर डॉ. व्ही. बी. पाटील यांचे "How to Get Research Fund from Funding Agencies" या विषयावर सादरीकरण झाले. या सादरीकरणास संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य, संशोधक विद्यार्थी व संशोधक मार्गदर्शक उपस्थित होते.
- विद्यापीठस्तरीय अविष्कार महोत्सवाचे आयोजन कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, गोपाळपूर, ता. पंढरपूर येथे दि.२४ व २५ डिसेंबर, २०११ या कालावधीत करण्यात आले. सदर महोत्सवात एकूण ११३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. त्यापैकी एकूण ४५ विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे १३ ते १५ जोनवारी, २०१२ या कालावधीत सहभाग नोंदविला.
- सोलापूर विद्यापीठासाठी राजीव गांधी सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी कमिशन, महाराष्ट्र शासन यांच्याकडून रु.६५,०००/- (रुपये पासष्ट हजार फक्त) इतकी रक्कम राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा करण्याकरिता मंजूर झाली असून या अंतर्गत विद्यापीठामध्ये दि.१४ ते १८ डिसेंबर, २०११ या कालावधीत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.
- उटी, तामिळनाडू येथे दि.२६/१२/२०११ ते दि.०४/०१/२०१२ दरम्यान भारत सरकार क्रीडा व खेल मंत्रालय, दिल्ली याच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकांसाठी या शिबीराचे राष्ट्रीय स्तरावर आयोजन केलेले होते. सदर शिबीरासाठी सोलापूर विद्यापीठाअंतर्गत एकूण १० स्वंयसेवक, स्वंयसेविका व कार्यक्रम अधिकारी यांनी आपला सहभाग नोंदविला.
- अहवाल कालावधीत एकूण ६० प्रशासकीय कर्मचारी सरळसेवेने हजर झाले.

- यु.जी.सी. ॲकेडेमिक स्टाफ कॉलेज, पुणे विद्यापीठ यांचे विद्यमाने पुणे विद्यापीठ येथे दि.०२/०१/२०१२ ते ०७/०१/२०१२ दरम्यान आयोजित केलेल्या प्रोफेशनल डेव्हलपमेंट प्रोग्राम या प्रशिक्षणास विद्यापीठातून एकूण ४ कर्मचाऱ्यांनी सहभाग नोदवून प्रशिक्षण पूर्ण केले.

- विद्यापीठाचा सातवा दीक्षांत समारंभ दि.२० जानेवारी, २०१२ रोजी संपन्न झाला. समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून मा. ना. श्री सुशीलकुमार शिंदे, केंद्रीय ऊर्जा मंत्री, भारत सरकार हे उपस्थित होते. विद्यापीठात प्रथमच सुवर्ण पदक देण्यास सुरुवात झाली. श्री. के. आर. जोशी व डॉ. बाबासाहेब पांडुरंग बंडगर यांच्यातर्फे विद्यापीठात गुणानुक्रमे विविध शाखेमधून सर्वप्रथम येणाऱ्य एकूण ६ विद्यार्थी / विद्यार्थिनीस अतिथींच्या हस्ते सुवर्णपदके प्रदान करण्यात आली.

- Indian Society of Chemists and Biologysts (ISCBC) या आंतरराष्ट्रीय संस्थेकडून (ISCBC-2012) या सतराव्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन सोलापूर विद्यापीठात दि.२१ ते २४ जानेवारी, २०१२ दरम्यान करण्यात आले. या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन मा. ना. श्री. सुशीलकुमार शिंदे, केंद्रीय ऊर्जा मंत्री, भारत सरकार यांच्या हस्ते संपन्न झाले.

- मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार दि.२५ जोनवारी, २०१२ हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा करण्याबाबत सर्व संलग्नित महाविद्यालयांना सूचित करुन सदर दिवशी राष्ट्रीय मतदार जागरण रॅलीचे आयोजन केले. रॅलीस एकूण ४५० स्वयंसेवक उपस्थित होते.

- एम. एल. सुखदिया विद्यापीठ, उदयपूर राजस्थान येथे आयोजित पश्चिम विभागीय युवा महोत्सवात सोलापूर विद्यापीठातून एकूण ४० विद्यार्थी कलाकारांचा संघ सहभागी झाला होता. सदर महोत्सवात विद्यापीठास नकला या कलाप्रकारात प्रथम, वक्तृत्व या कलाप्रकारात द्वितीय तर वादविवाद या कलाप्रकारात तृतीय अशी एकूण तीन पारितोषिके मिळाली.

- विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून सन २०१०-११ साठी विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे संकूलातील प्राचीन भारतीय इतिहास या विषयातील पीएच.डी. चे संशोधन करणाऱ्या दोन अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु.२,५०,०००/- प्रमाणे शिष्यवृत्ती विद्यापीठास प्राप्त झाली.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे, सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग महाराष्ट्र शासन यांनी दिलेल्या अनदानातून केंद्रीय लोकसेवा आयोग सर्व परीक्षा तयारीसाठी ५० अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी दरमहा रु.२,०००/- इतक्या विद्यावेतनासहित विनामूल्य प्रशिक्षण कार्यक्रमास सुरुवात झालेली आहे.

- विद्यापीठास The Association of Commonwealth Universities, United Kingdom यांचे सभासदत्व मिळाले आहे.

- दि.१०/०२/२०१२ ते दि.१६/०२/२०१२ या सात दिवसाच्या कालावधीमध्ये सोलापूर विद्यापीठाच्या परिसरामध्ये "पर्यावरण संरक्षणासाठी युवक" या विषयावर आधारित राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर शिबिरामध्ये महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठामधून एकूण ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.
- दि.१३ फेब्रुवारी, २०१२ रोजी डॉ. अनंत आणि लता लाभसेटवार प्रतिष्ठान व सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "उच्च शिक्षण क्षेत्रासमोरील आव्हाने" या विषयावर मा. डॉ. जनार्दन वाघमारे संस्थापक कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.
- राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत पुणे विद्यापीठ, पुणे येथे दि.२१/०२/२०१२ ते दि.२७/०२/२०१२ अखेर राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबिर आयेजित करण्यात आले होते. सदर शिबिरासाठी अकलूज विभागातील एकूण चार महाविद्यालयातून प्रत्येकी दोन स्वयंसेवक आणि एक संघव्यवस्थापक शिबिरामध्ये सहभागी झाले.
- दि.०१ मार्च, २०१२ रोजी विद्यापीठातील इन्स्टुमेंटेशन सेंटरचे उद्‌घाटन भारताचे माजी राष्ट्रपती मा. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे शुभहस्ते संपन्न झाले. त्यावेळी पद्मविभूषण मा. डॉ. अनिल काकोडकर अध्यक्ष, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग महाराष्ट्र शासन, सोलापूरचे जिल्हाधिकारी, माहापौर सोलापूर महानिगरपालिका, जिल्हापरिषदेचे अध्यक्ष व इतर मान्यवर उपस्थित होते.
- Indian Council of Social Science Research (ICSSR) नवी दिल्ली या संस्थेकडून डॉ. सी. एस. भानुमते यांनी सादर केलेल्या "An Economic Anayalysis of Bidi Industry in Solapur" या संशोधन प्रकल्पास रु.७,१२,७२५/- इतके अनुदान मंजूर झाले. तसेच प्रा. श्रीमती एम. एस. म्हेत्रे यांनी सादर केलेल्या "To Study Emotional Intellegence of Adolescent Students" या संशोधन प्रकल्पास रू.२,४१,८७५/- इतके अनुदान मंजूर झाले आहे.
- राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यापीठस्तरीय पुरस्कार वितरण समारंभ प्रा. इंद्रजित भालेराव यांच्या प्रमुख उपस्थित दि.१३ मार्च, २०१२ रोजी संपन्न झाला.
- दि. १६ मार्च, २०१२ रोजी सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व यंशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे (यशदा) यांच्या संयुक्त विद्यामाने "माहिती अधिकार अधिनियम २००५" या विषयावर संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य, माहिती अधिकारी, सहायक माहिती अधिकारी तसेच विद्यापीठाकडील वर्ग १ व वर्ग २ अधिकाऱ्यांकरिता एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

सदर सभेत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

[ १ ] अधिसभेच्या दि.९ डिसेंबर, २०११ रोजी झालेल्या तिसऱ्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

(टिपणीः सर्व अधिसभा सदस्यांना परिनियम क्र.४८५ नुसार विद्यापीठ पत्र जा.क्र. सोविसो/सनिवि/अधिसभा/८६०९, दि.२९ डिसेंबर २०११ अन्वये, दि.९ डिसेंबर, २०११ रोजी झालेल्या तिसऱ्या सभेचा कार्यवृत्तांत पाठविण्यात आलेला होता. या कार्यवृत्तांतामध्ये दुरुस्त्या सुचविण्याची अंतिम तारीख दि.२९/०१/२०१२ अशी होती. मुदतीत कोणत्याही सदस्यांकडून दुरुस्त्या प्राप्त झालेल्या नाहीत. तथापि, प्रशासनाकडून आलेली दुरुस्ती खालीलप्रमाणे मा.कुलगुरुंनी स्वीकारली आहे.

**दुरुस्ती : पान क्र. १ वर, उपस्थितीमध्ये अ.क्र. २) मध्ये "प्रभारी कुलगुरु तथा" हे शब्द वगळण्यात यावेत.**

सबब, वरील दुरुस्तीसह अधिसभेचा दि.०९ डिसेंबर, २०११ रोजी झालेल्या तिसऱ्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यासाठी मान्यतेस्तव सादर).

ठरावः **अधिसभेच्या दि.९ डिसेंबर, २०११ रोजी झालेल्या तिसऱ्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून वरील दुरुस्तीसह कायम करण्यात आला.**

[ २ ] अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यांना दिली जाणारी उत्तरे तसेच पूरक प्रश्न व त्यांना द्यावयाची उत्तरे, परिनियम ४७६(८) च्या तरतूदीमधील विनिर्दिष्टप्रमाणे अधिसभा सदस्यांना अन्य सदस्याने विचारलेल्या प्रश्नास दोन पूरक प्रश्न विचारता येतील.
(टिपणीः परिनियमानुसार प्रश्न आणि त्यांना व्यवस्थापन परिषदेने तयार केलेल्या उत्तराचे विवरणपत्र सोबत जोडले आहे).

ठरावः **अ) प्रश्नोत्तराचा तास दुपारी १२:१५ वाजता सुरु झाला व प्रश्नोत्तरे संपल्याने दुपारी १२:३५ वाजता प्रश्नोत्तराचा तास संपला.**
**ब) प्रश्नोत्तराच्या तासामध्ये विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे याची प्रत सोबत जोडली आहे (जोडपत्र "अ")**
**क) प्रश्नोत्तराच्या तासात प्रश्न क्र. १ ते ३ व त्यावर सदस्यांनी विचारलेल्या उपप्रश्नांची उत्तरे देण्यात आली.**

[ ३ ] **सन २०१०-११ चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेची शिफारस विचारार्थ.**

श्री. गायकवाड बी. आर. यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालील प्रस्ताव सादर केलेला आहे.

"ही अधिसभा वित्त व लेखा समितीने व व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी विचारात घेवून असा ठराव करते की, व्यवस्थापन परिषदेने सन २०१०-११ च्या लेखापरीक्षण अहवालाबाबत केलेल्या शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात याव्यात."

(टिपणी: सन २०१०-११ चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ७५ (२) (छ) (४) नुसार वित्त व लेखा समितीच्या दि.२८/०२/२०१२ रोजी झालेल्या सभेत विषय क्र. ०२ नुसार माहितीसाठी व विचारार्थ सादर केला असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

ठराव: विद्यापीठाचा सन २०१०-११ चा लेखापरीक्षण अहवाल, लेखा आक्षेप पुर्तता उपसमितीच्या शिफारशीसह व्यवस्थापन परिषदेस सादर करण्याबाबत शिफारस करण्यात आली.

लेखापरीक्षण अहवालावरील आक्षेप व लेखापरीक्षण अहवाल अंतिम करण्यासाठी Account Code 1.48 g, h) नुसार मा.कुलगुरु यांनी वित्त व लेखा समितीची खालीलप्रमाणे उपसमिती गठीत केली.

| | |
|---|---|
| १) श्री. गायकवाड बी. आर. | - सदस्य |
| २) डॉ. कुलकर्णी बी. एच. | - सदस्य |
| ३) श्री. रिसबूड एस. एच. | - निमंत्रित तज्ञ सदस्य |

या समितीने दि.०१/०३/२०१२ रोजी बैठक घेवून अहवाल वित्त व लेखा विभागाकडे सादर केला. सदरचा अहवाल दि.०२/०३/२०१२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केला असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

ठराव : सन २०१०-११ च्या वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालाबाबत वित्त व लेखा समितीने व उपरोक्त उपसमितीने केलेली मान्यतेची शिफारस स्विकारण्यात येवून अधिसभेस शिफारस करण्यात आली.

सबब, सन २०१०-११ च्या वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठराव: श्री. गायकवाड बी. आर. यांच्या वतीने श्री. सलगर बी. एस. यांनी सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास श्री. जमादार के. एम. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर खालील अधिसभा सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले.**

**१) श्री. एस. एच. रिसबूड**

**२) डॉ. बी. पी. रोंगे**

**३) डॉ. ए. एन. बारबोले**

**४) प्राचार्य डॉ. के. एन. गणगे**

**५) डॉ. पी. बी. जोशी**

**यांनी विचार मांडल्यानंतर लेखापरीक्षण अहवालातील आक्षेप व त्याबाबत कार्यालयाने केलेली पूर्तता यावर मुद्देसूद चर्चा झाली व सदर प्रस्ताव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ ४ ] सन २०११-१२ च्या सुधारीत अंदाजपत्रक व २०१२-१३ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालील प्रस्ताव सादर केलेला आहे.

"ही अधिसभा वित्त व लेखा समितीने व व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी विचारात घेवून असा ठराव करते की, व्यवस्थापन परिषदेने सन २०११-१२ च्या सुधारीत अंदाजपत्रक व २०१२-१३ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत केलेल्या शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात याव्यात."

(टिपणी: सन २०११-१२ चे सुधारीत अंदाजपत्रक व २०१२-१३ चे मूळ अंदाजपत्रक तयार करण्याकरीता खालीलप्रमाणे अर्थसंकल्प उपसमिती गठीत करण्यात आली होती.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. | - | सदस्य |
| २) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. | - | सदस्य |
| ३) | श्री. रिसबूड एस. एच. | - | सदस्य |
| ४) | श्री. खुर्द एस. जी., उपकुलसचिव | - | सदस्य |

सदर समितीने तयार केलेले सन २०११-१२ चे सुधारीत अंदाजपत्रक व २०१२-१३ चे मूळ अंदाजपत्रक वित्त व लेखा समितीच्या दि.२१/०२/२०१२ रोजी झालेल्या सभेतील विषय क्र. ०३ नुसार सादर केले असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

ठराव : सन २०११-१२ च्या सुधारीत अंदाजपत्रकास व सन २०१२-१३ च्या मूळ अंदाजपत्रकास दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.

वरीलप्रमाणे वित्त व लेखा समितीची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या दि.०२/०३/२०१२ रोजी झालेल्या सभेत विषय क्र. १९ अन्वये विचारार्थ सादर केली असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झ ाला.

ठराव : सन २०११-१२ च्या सुधारीत अंदाजपत्रक व २०१२-१३ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत वित्त व लेखा समितीने दुरुस्तीसह केलेली मान्यतेची शिफारस स्विकारण्यात येवून अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.

सबब, सन २०११-१२ च्या सुधारीत अंदाजपत्रक व २०१२-१३ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठरावः सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास डॉ. बारबोले ए. एन. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर खालील अधिसभा सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले.**

**१) श्री. रिसबूड एस. एच.**
**२) डॉ. रोंगे बी. पी.**
**३) प्राचार्य डॉ. गणगे के. एन.**
**४) डॉ. जोशी पी. बी.**
**५) डॉ. बारबोले ए. एन.**
**६) श्री. सलगर बी. एस.**

**त्यानंतर सदर प्रस्ताव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ ५ ] सोलापूर विद्यापीठाचा सन २०१०-११ या वर्षाच्या ७ व्या वार्षिक अहवाल (मराठी) बाबत व्यवस्थापन परिषदेची शिफारस विचारार्थ.**

प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालील प्रस्ताव सादर केलेला आहे.

" ही अधिसभा वार्षिक अहवाल समितीने व व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी विचारात घेवून असा ठराव करते की, व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठाच्या सातव्या वार्षिक अहवालाबाबत केलेल्या शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात याव्यात."

( **टिपणी** :-सोलापूर विद्यापीठाचा सन २०१०-२०११ या वर्षाचा ७ वा वार्षिक अहवाल (मराठी) तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. | - | अध्यक्ष |
| २) | डॉ. इंगोले के. जे. | - | सदस्य |
| ३) | डॉ. कदम एस. डी. | - | सदस्य |
| ४) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | - | सदस्या |
| ५) | डॉ. श्रीमती ॲनी जॉन | - | सदस्या |
| ६) | श्रीमती चोपडे ए. बी., सहायक कुलसचिव | - | सदस्य सचिव |

सदर समितीने तयार करुन दिलेला वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या दि.०२/०३/२०१२ रोजीच्या सभेतील विषय क्र.८ नुसार विचारार्थ ठेवला असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

ठराव : सोलापूर विद्यापीठाचा सन २०१०-११ चा वार्षिक मराठी अहवाल स्विकारुन अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.

सबब, सन २०१०-२०११ च्या वार्षिक अहवाल (मराठी) बाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

ठरावः **सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास श्री. एस. एच. रिसबूड यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर खालील अधिसभा सदस्यानी आपले विचार व्यक्त केले.**

**१) डॉ. बारबोले ए. एन.**

**त्यानंतर सदरचा प्रस्ताव एकमताने मान्य करण्यात आला.**

**[ ६ ] महाराष्ट्र शासनाच्या दि.१४ सप्टेंबर, २००९ रोजीच्या शासन राजपत्रानुसार, विविध अधिकारमंडळावर निवडून, नामनिर्देशनाद्वारे, स्वीकृत सदस्य म्हणून येण्याकरीता पात्रतेच्या अटी व शर्तीच्या परिनियमांबाबत व दीक्षांतबाबत परिनियमासंदर्भात व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

श्री. सलगर बी. एस. यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालील प्रस्ताव सादर केलेला आहे.

" ही अधिसभा परिनियम समितीने व व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी विचारात घेवून असा ठराव करते की, व्यवस्थापन परिषदेने महाराष्ट्र शासनाच्या दि.१४ सप्टेंबर, २००९ रोजीच्या शासन राजपत्रानुसार, विविध अधिकारमंडळावर निवडून, नामनिर्देशनाद्वारे, स्वीकृत सदस्य म्हणून येण्याकरीता पात्रतेच्या अटी व शर्तीच्या व दीक्षांतसंदर्भातील सोलापूर विद्यापीठाने नव्याने तयार केलेल्या परिनियमाबाबत केलेल्या शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात याव्यात."

(टिपणीः सोलापूर विद्यापीठाची स्थापना महाराष्ट्र शासनाच्या दि.२२ जुलै, २००४ रोजीच्या अधिसूचनेनुसार झालेली आहे. दि.२२ जुलै, २००४ रोजीच्या अधिसूचनेतील खालील कलमान्वये,

**(एक) या कलमान्वये शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी तयार केलेले केलेले परिनियम, अध्यादेश, विनियम आणि नियम यांचे सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्याकडून उक्त अधिनियमाखालील अधिकारांचा वापर करुन अधिक्रम करण्यात येईपर्यंत किंवा त्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत, ते अंमलात असणे चालू राहील आणि ते, उक्त अधिनियमान्वये सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडून करण्यात आल्याचे मानण्यात येईल;**

वरील कलमानुसार, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचेच परिनियम सोलापूर विद्यापीठाचे परिनियम म्हणून सध्या वापरण्यात येत आहेत. महाराष्ट्र शासनच्या दि.१४ सप्टेंबर, २००९ रोजीच्या शासन राजपत्रानुसार, विविध अधिकारमंडळावर निवडून, नामनिर्देशनाद्वारे, स्वीकृत सदस्य म्हणून येण्याकरीता पात्रतेच्या अटी व शर्ती पारीत केलेल्या आहेत. या अटी व शर्ती लागू करण्याकरीता मा.कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १४(८) नुसार ऑर्डर काढलेली होती. सोलापूर विद्यापीठाने शिवाजी विद्यापीठाचे असलेले परिनियम क्र. S.382 ते S.467 यामध्ये बदल करुन नव्याने सोलापूर विद्यापीठाचे परिनियम त्याचे क्रमांक SUSS.301 ते SUSS.387 असे आवश्यक ते बदल केलेले आहेत. तसेच शिवाजी विद्यापीठाचे दीक्षांतसंदर्भात असलेले परिनियम क्र. S.546 ते S.549 यामध्ये बदल करुन नव्याने सोलापूर विद्यापीठाचे परिनियम व त्याचे क्रमांक SUSS.388 ते SUSS.391 असे आवश्यक ते बदल केलेले आहेत.

याकरिता खालीलप्रमाणे परिनियम समिती गठीत करण्यात आलेली होती.

१) प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. - अध्यक्ष
२) श्री. गायकवाड बी. आर. - सदस्य
३) श्री. सलगर बी. एस. - सदस्य
४) प्राचार्य डॉ. गणगे के. एन. - सदस्य
५) प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन. - सदस्य
६) श्री. नावरे एस. टी. - निमंत्रित
७) श्री. राम पवार - निमंत्रित

वरीलप्रमाणे परिनियम समितीने तयार केलेले परिनियम व्यवस्थापन परिषदेच्या दि.०२/०३/२०१२ रोजी झालेल्या सभेत विषय क्र. १७ नुसार विचारार्थ सादर केले असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

ठराव : सोलापूर विद्यापीठाने नव्याने तयार केलेले परिनियम क्रमांक **SUSS.301, 303, 305, 306, 309, 310, 313, 314, 318 ते 340, 341 ते 391** व या अनुषंगाने परिशिष्ट II, III, IV, V बाबत परिनियम समितीने केलेली शिफारस स्विकारुन अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.

सबब, सोलापूर विद्यापीठाने नव्याने तयार केलेल्या परिनियमांबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली मान्यतेची शिफारस विचारार्थ).

**ठरावः सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास डॉ. चव्हाण सी. एस. यांनी अनुमोदन दिले. त्यावर खालील अधिसभा सदस्यंनी आपले विचार व्यक्त केले.**

**१) डॉ. बारबोले ए. एन.**

**२) श्री. रिसबूड एस. एच.**

**३) प्राचार्य डॉ. गणगे के. एन.**

**त्यानंतर सदरचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या पुनश्चः विचारार्थ पाठविण्याचे ठरले.**

[ ७ ] **अधिसभा सदस्य डॉ. चव्हाण सी. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

विद्यापीठाच्या परिक्षांची बैठक व्यवस्था ही विद्यार्थ्यांच्या आडनावाच्या आद्याक्षरावरुन करावी. असा प्रस्ताव अधिसभा परीक्षा मंडळास करित आहे.

**ठरावः सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. बारबोले ए. एन. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

[ ८ ] **अधिसभा सदस्य श्री. पिटके संदीप यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

सोलापूर विद्यापीठात सध्या मुलांचे व मुलींचे असे प्रत्येकी एक वसतिगृह आहे. या वसतिगृहातील खोल्यांची संख्या विद्यार्थ्यांच्या संख्येच्या तुलनेने कमी पडत असल्याने विद्यापीठास आणखी मुलांचे व मुलींचे असे प्रत्येकी एका वसतिगृहाची आवश्यकता आहे. ही अधिसभा मुलांचे व मुलींचे वसतिगृह आणखी प्रत्येकी एक असे बांधकाम करण्यास व अनुषंगिक कामाबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस करीत आहे.

ठरावः **सदरचा ठराव श्री. पिटके संदीप यांच्यावतीने श्री. खंडाळे खंडू यांनी मांडल्यानंतर त्यास श्री. शिंदे आर. बी. यांनी अनुमोदन दिले. सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

[ ९ ] **अधिसभा सदस्य डॉ. चव्हाण सी. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

सेमिस्टर १, ३, ५ व २, ४, ६ यांच्या प्रश्नपत्रिका एकाचवेळी काढण्याऐवजी त्या त्या परिक्षांच्यापूर्वी काढण्यात याव्यात असा ठराव अधिसभा परिक्षा मंडळास करित आहे.

ठरावः **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य डॉ. चिट्टे जी. एन. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. चव्हाण सी. एस. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ १० ] **अधिसभा सदस्य श्री. कांबळे एन. आर. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून पूर्वी प्रमाणे एका वर्गाचा (उदा - बी ए. भाग -३ किंवा बी एस्सी भाग-३ ) निकाल एक गठ्ठा पाठविले जात नाहीत. तर ते टप्या - टप्या ने पाठविले जातात. त्यामुळे अनेक अडचणी निर्माण होतात. अशा प्रकारे टप्या - टप्या ने निकाल न पाठविता ते एक गठ्ठा (एकाच वेळी) पाठविण्यात यावेत. म्हणून ही अधिसभा परीक्षा मंडळाकडे शिफारस करीत आहे

**ठरावः सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. श्रीमती दळवी आर. जे. यांनी अनुमोदन दिले. सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

[ ११ ] **अधिसभा सदस्य डॉ. चव्हाण सी. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

प्रश्नपत्रिका इंग्रजी, मराठी प्रत, उत्तराची कळ यासाठी देण्यात येणाऱ्या मानधनाची पुर्नरचना करण्यात यावी असा ठराव अधिसभा परिक्षा मंडळास करित आहे.

**ठरावः सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. चव्हाण सी. एस. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

मा. अध्यक्ष्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **कुलसचिव** | **मा. कुलगुरु** |
| **सचिव, अधिसभा** | **अध्यक्ष, अधिसभा** |

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## प्रश्नोत्तरे

**अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यावर विद्यापीठ प्रशासनाने तयार केलेली उत्तरे**

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ● | **डॉ. चव्हाण सी. एस.** | ● **डॉ. सूर्यवंशी ए. बी.** |
| १) | पीएच.डी. करीताच्या रिसर्च सेंटर व रिसर्च प्लेस यांच्या प्रवेशाची नियमावली काय आहे ? | - प्रश्न संदिग्ध आहे. |
| | ● पीएच.डी. करीताच्या रिसर्च सेंटरसाठी विद्यापीठाने नियमावली तयार केली आहे काय ? असल्यास विविध प्राधिकरणाने त्यास मान्यता दिली आहे काय? | - रिसर्च सेंटर व रिसर्च प्लेस याकरीता नियमावली तयार केली आहे. त्यास विद्यापरिषदेने मान्यता दिली आहे. |
| | ● त्या त्या रिसर्च सेंटरला / प्लेसला ती पुरविली गेली आहे काय? | - नियमावलीप्रमाणे समित्या ज्या ज्या कॉलेजने मागणी केलेली असेल त्या कॉलेजला समिती देण्यात आली आहे. समितीला इन ॲडव्हान्स सर्व अटी दिल्या जातात. आणि ज्यांनी रिसर्च सेंटर किंवा रिसर्च प्लेस मागणी केली आहे त्या महाविद्यालयालादेखील इन ॲडव्हान्स नियमावली दिली जाते. |
| | ● रिसर्च प्लेसच्या विद्यार्थ्यांचे प्रवेश विद्यापीठात होणार त्यामुळे त्याची भरलेली प्रवेश फी आहे, ट्यूशन फी आहे त्याचा काही हिस्सा रिसर्च प्लेसला देणार का ? देणार असाल तर किती देणार ? | - रिसर्च प्लेसच्या विद्यार्थ्यांनी भरलेल्या प्रवेश फीमधून काहीही हिस्सा रिसर्च प्लेसला देण्यात येणार नाही. |
| | ● प्रवेशाचे अधिकार कोणाला आहेत ? | - विद्यापीठच प्रवेश देणार आहे. |
| २) | ६व्या वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे विद्यापीठाकडून वेतन निश्चिती व स्थाननिश्चिती केव्हा केली जाणार ? | ● सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन निश्चिती पूर्ण करण्यात आली आहे. तद्वतच ५ व ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे स्थाननिश्चितीसाठी एकूण **२२७** प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.<br>● मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांना दिनांक २३-०९-२०११, १४-११-२०११ व २०-१२-२०११ अन्वये स्थान निश्चिती निवड समितीसाठी शासनाच्या प्रतिनिधींचे नाव पाठविण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. शासन प्रतिनिधींचे नाव प्राप्त होताच स्थान निश्चिती शिबीर आयोजित करुन, वरिष्ठ निवड श्रेणीत स्थान निश्चिती करण्यात येईल. नुकतेच १५ मार्च, २०१२ रोजी पत्र पाठविण्यात आले आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | ● सर्व प्रोफेशनल महाविद्यालयांची स्थाननिश्चिती झालेली आहे काय तसेच प्रोफेशनल कॉलेजमध्ये स्थान निश्चिती झाली नसल्यास त्यासाठी विद्यापीठाने एखादी समिती नेमली आहे काय ? | - सर्वच महाविद्यालयांना स्थान निश्चितीसंदर्भात प्रस्ताव पाठविण्याबाबत पत्र पाठविण्यात आले आहे. महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या स्थान निश्चिती प्रस्तावांची छाननी झाली असून स्थान निश्चिती होणे बाकी आहे. त्यामध्ये प्रोफेशनल व नॉन-प्रोफेशनल असा भेद केलेला नाही. |
| | ● विद्यापीठाने सहसंचालकांना तीन वेळा पत्र दिले आहे. चौथ्यांदा दिले. एवढी पत्र देवूनसुध्दा जर सहसंचालक प्रतिनिधी देत नसतील तर विद्यापीठाने स्थाननिश्चिती कॅम्प घ्यायला काय हरकत आहे ? | - करता येऊ शकेल. त्या त्या महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे विषयतज्ञाची मागणी करावी विषयतज्ञाची मागणी केल्यानंतर विद्यापीठ त्यांना विषयतज्ञ देतील आणि मग शासनाचा प्रतिनिधी त्या महाविद्यालयाने मागवून घेवून स्थान निश्चिती केली तरीसुध्दा विद्यापीठाची काही हरकत नाही. पण विद्यापीठाने सर्वांच्या सोयीसाठी कॅम्प घेण्याची प्रथा पाडलेली आहे. फार मोठा खर्च प्रत्येक महाविद्यालयांचा होवू नये हा हेतू आहे. जर व्यक्तिशः महाविद्यालय खर्च करु शकत असेल तर विद्यापीठ त्याला तयार आहे व त्यांना विषयतज्ञ देवू शकते. |
| ● | **<u>डॉ. बाड डी. आर.</u>** | ● **<u>प्राचार्य डॉ. गणगे के. एन.</u>** |
| ३) | १९९४ विद्यापीठ कायदयानुसार विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयात स्थानिक व्यवस्थापन समिती स्थापन करुन या समितीने आपल्या कामाचा अहवाल ३० जून पूर्वि विद्यापीठाला देणे बंधनकारक आहे. आतापर्यंत संलग्नित असणाऱ्या किती महाविद्यालयांनी आपला अहवाल विद्यापीठाकडे पाठविलेला आहे. | सर्व संलग्नित महाविद्यालयात स्थानिक व्यवस्थापन समिती स्थापन केलेल्या आहेत. तथापि आतापर्यंत एका संलग्नित महाविद्यालयाने सन २०१०-११ चा अहवाल सादर केलेला आहे. |
| | ● अहवाल पाठविला नसल्यास काय कारवाई केली. | - या कार्यालयाच्या पत्रान्वये दि.१७.०३.२०१२ पूर्वी अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. त्यानुसार ६८ महाविद्यालयाने अहवाल पाठविलेले आहेत. |
| | ● किती वर्षापासूनचे अहवाल महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे जमा केले आहेत ? | - विद्यापीठाच्या स्थापनेपासूनचे. |

सही/-
सचिव अधिसभा
(कुलसचिव)